# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधीक्षक कार्यालय नागपूर

दिनांक ११/०७/२०२१ (रविवार )


## उभ्या ट्रक मधुन मोबाईल चोरी करणारे 02 आरोपीतांना स्थानिक गुन्हे शाखा यांनी केले जेरबंद

पोस्टे मौदा हद्‌दीतील मौजा महालगाव शिवारातील ठाकरे ढाबा समोर उभ्या असलेल्या ट्रक मधुन दि. १०/७/२१ रोजी दुपारी २.०० वा. चे सुमारास कोणीतरी अज्ञात इसमाने ट्रक मध्ये ठेवलेले दोन मोबाईल फोन व नगदी ८५,०००/— रू चोरून नेल्याचे फिर्यादीचे रिपोर्ट वरून पो.स्टे. मौदा येथे अप.क्र. ४००/२१ कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हयाचे समांतर तपासा दरम्यान स्थानिक गुन्हे शाखे कडून आपले सुत्रदार लावुन आरोपीतां बाबत माहीती प्राप्त केली असता सदर गुन्हयात कामठी रमानगर येथील बादल संजय संतापे वय २० वर्ष व सुरज विकास रंगारी वय २७ वर्ष असल्याचे समजल्यावरून त्यांना पहाटे त्यांचे घरून ताब्यात घेवुन सदर आरोपींना गुन्हयासंबधाने सखोल विचारपुस केली असता, त्यांनी गुन्हा केल्याचे संगीतले व सदर गुन्हयातील चोरीस गेलेले सॅमसंग कपंनीचा मोबाईल व रेडमी कपंनीचा मोबाईल तसेच गुन्हयात वापरलेली ॲक्टीवा मोपेड क्र. एमएच—४०—बीपी—९६०९ जप्त करून दोन्ही आरोपीतां पुढील कार्यवाही करीता पो.स्टे.मौदाचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे मार्गदर्शनात सहा.पोलीस निरीक्षक अनिल राउत, सफौ लक्ष्मीप्रसाद दुबे, पोलीस हवालदार विनोद काळे, ना.पो.शि. शैलेश यादव, अरविंद भगत, सत्यशिल कोठारे, पोशि विरेन्द्र नरड, सहा. फौजदार साहेबराव बहाळे, यांनी पार पाडली.

(सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे.)



## —: जबरी चोरी करणारे जेरबंद कुही पोलीसांची कार्यवाही :—

भेराराम जोराराम चौधरी, वय ३१ वर्ष रा. शिवाजी गेट महाल, गुलाबराव सिताराम सोलंकी यांच्या घरी किरायाने, नागपूर हे मोबाईल चे सुटे पार्ट विकण्याचे व्यवसाय करतात दिनांक ०९/०७/२०२१ रोजी हे आपल्या मोटार सायकलने भिवापूर येथून मोबाइल पार्टस व ॲसेसिरीज विक्री चे पैसे वसुली करून नागपूर येथे घरी परत जात असता पो.स्टे. कुही अंतर्गत अंतर्गत २८ किमी अंतरावरील मौजा उटी शिवार, नागपूर उमरेड रोड गॅस गोडाउन पुलिया जवळ अंदाजन १७.०० वा. दरम्यान ३ अनोळखी इसम ट्रिपल सीट बिना नंबर प्लेट च्या गाडीवर बसुण मागुन येउन यास गाडी थांबविण्याचे भाग पाडून, दगडाचा धाक दाखवुन खिशातील नगदी १३,३००/—रू. जबरदस्तीने हिसकावुन पळुन गेले. फिर्यादीचे रिपोर्ट वरुन अप क्रमांक २५१/२०२१ कलम ३९२,३४ भा.द.वि. दाखल करुन तपास सुरु करण्यात आला व या घटनेत १)शेख रिजवान शेख वय २२ वर्ष बहादुरा फाटा नागपुर, २) मोहमद अताकला शेख वय २१ वर्ष रा चामट चौक नागपुर, ३) सुनान सलीम शेख वय १८ वर्ष रा. आझाद कॉलनी नागपुर ४) ज्ञानेश्वर बाबराव भुजाडे वय २७ वर्ष रा वार्ड क्र २ भिवापुर यांचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना दिनांक १०/०७/२०२१ चे ०३.०९ वा. अटक करण्यात आली असून पुढील तपास पोनि चंद्रकांत मदने मो. क्र. ९९२२४ ३६१९५ हे करित आहेत.

## —: घरफोडी :—

पो.स्टे. कन्हान :— अंतर्गत ३ किमी अंतरावरील मौजा टेकाडी येथे मोना राजकुमार शुक्ला रा. टेकाडी रोड माधव नगरी कन्हान यांची मिठाईची दुकान असून दिनांक ०९.०७.२१ चे १७.०० वा. ते १०/७/२१ चे ०७.०० चे दरम्यान कोणीतरी अज्ञात इसमांनी सदर लॉक तोडून आत प्रवेष करून दुकानातील ड्रावर तोडुन त्यात ठेवलेले ७००० रू नगदी व कोलड्रीक्स चे काही बाटल कोणी तरी चोराने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी मोना राजकुमार शुक्ला वय ३४ वर्ष रा. टेकाडी रोड माधव नगरी कन्हान यांचे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. कन्हान येथे कलम ४५७,३८० भादवि चा गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोना मनोज जैस्वाल मो. क्र. ९९२३१४३९६२ हे करित आहेत.

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत १ किमी अंतरावर रामटेक रोड वर शंकर दिवाळुजी सुपारे वय २७ वर्ष रा. रामटेक रोड साईनगर मौदा यांनी सुपारे मेडीकल म्हणुन दुकान असून दिनांक ०९.०७.२१ चे २२.०० वा. दरम्यान कोणीतरी अज्ञात इसमांनी मेडीकल दुकानाचे शटरची पट्टीला तोंडून आत प्रवेश करुन कॉउन्टर मध्ये ठेवलेले एक दिवसाच्या दवाई विक्रीचे अंदाजे २००००/रु व डी व्ही आर अंदाजे कि. ३०००/रु व सी. पी. यु अंदाजे कि. ३०००/रु असा एकुन २६०००/चा माल कोणी तरी अज्ञात चोराने चोरी करुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी शंकर दिवाळुजी सुपारे वय २७ वर्ष रा. रामटेक रोड साईनगर मौदा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. मौदा येथे कलम ४५७,३८० भादवि चा गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सपोनि सोनेकर मो.नं. ८९७५९ २१७७० हे करित आहेत.

## –: चोरी (चारचाकी वाहनामधुन ):–

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत १४ किती अंतरावरीत मौजा १४ मैल येथे अपोलो टायर गोडावुन आर.डी. सी. चेन्नई ३ एस व्ही ग्लोबल लॉजीस्टीक, ता. कळमेश्वर जि. नागपुर येथे दिनांक ०७/०६/२०२१ चे ११.१५ वा. ते १०/०६/२०२१ चे ०८.३० वा. दरम्यान दूराईसिंग मारीमूथू वय २६ वर्षे व्यवसाय चालक रा नं ५६७ बी व्ही कॉलनी २० रोड व्यसरपडी चेन्नई एम कार्पो चेन्नई तामीळनाडु याचे अशोक लेलॅन्ड कटेंनर क्र.टी एन.३२ एजे ३३१० चे मागील दरवज्याचे सील तोडुन, त्यामधुन ७५०००/–रूपये किमंतीचे अपोलो कपनीचे ६–७ टायर टयुब,फ्लॅन इत्यादी कोणीतरी अज्ञात इसमांनी चोरुन नेला

सदर प्रकरणी फिर्यादी दूराईसिंग मारीमूथू वय २६ वर्षे व्यवसाय चालक रा नं ५६७ बी व्ही कॉलनी २० रोड व्यसरपडी चेन्नई एम कार्पो चेन्नई तामीळनाडु यांचे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम ३७९ भादवि चा गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सपोनी खडसे मो.नं. ९४२१० ५०३७० हे करित आहेत.

## –: हयीगयी ने मृत्यु :–

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत १० अंतरावरील मौजा कालभैरवपेठ शिवारात दिनांक १०/०७/२१ चे ०५. ३० वा.दरम्यान सुरेश कुवरधर्मा कुर्रे, वय २९, रा. डबलु, सी.एल. कॉलनी वलनी खदान, खापरखेडा हा रामबिहारी सुरजनाथ बारी, वय ५१, रा.वलनी खदान, खापरखेडा यांचे सोबत महीन्द्रा स्कारपीओ गाडी क्र. एम. एच.– ४६, डबलु– २७६८ नी कालभैरवपेठ ते भागेमाहेरी रोडने चालवित जात असता **आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजी पणाने चालविले त्यामुळे चालकाचा वाहनावरील नियंत्रण गेल्याने वाहन पल्टी होवुन अपघात झाला सदर अपघातात चालक** सुरेश कुवरधर्मा कुर्रे, वय २९, रा. डबलु, सी.एल. कॉलनी वलनी

खदान, खापरखेडा  स्वत: मरण पावला व सोबत बसलेला रामबिहारी सुरजनाथ बारी, वय ५१, रा.वलनी खदान, खापरखेडा  हा जख्मी झाला

सदर प्रकरणी फिर्यादी रामबिहारी सुरजनाथ बारी, वय ५१, रा.वलनी खदान, खापरखेडा यांचे तोंडी रिपोर्ट पो.स्टे. पारशिवनी येथे अप क्रमांक १६५/२१  कलम  २७९, ३३७, ३०४(अ) **भा.द.वी.**  सहकलम १८४ **मो. वा.का.** दाखल करण्यात आला असून पुढील तपास  पोउपनि पळनाटे मो.क्र. ७३८७० ८६१७८ हे करित आहेत

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर**